
# अभ्यासात उच्चारणशास्त्र महत्वाचे -डॉ.भोसले



**देगलूर/ प्रतिनिधी**

समकालीन भाषा अभ्यासताना अभ्यासकांना उच्चारणशास्त्र ही तितकेच महत्वाचे असते असे मत नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ उध्दव भोसले यांनी व्यक्त केले.

ते यशवंत महाविद्यालयातील डॉ.एल.व्ही.पद्माराणी राव, देगलूर महाविद्यालयातील प्रा.डॉ.लक्ष्मणकुमार सुदाम व डॉ विनय भोगले लिखित अंडरस्टँडिंग ऑफ फोनोलॉजीर आणि रअंडरस्टँडिंग ऑफ इंग्लिश ग्रामर या दोन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा विद्यापीठात ७ सप्टेंबर रोजी झाला. प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहूणे प्र कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, अधिष्ठाता डॉ.अजय टेंगसे, देगलूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांची उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ.भोसले म्हणाले की, कुठली ही भाषा अभ्यासताना उच्चारण जर योग्य असेल तर ते प्रभावी होते यासाठी भाषा आणि उच्चारणाची सांगड महत्वाची असते. अभ्यासामध्ये उच्चारण शास्त्र आणि व्याकरण हे अतिशय महत्त्वाचे विषय असून या संबंधित भाषेचा अभ्यास या प्राध्यापकांनी केलेला आहे हे अभिनंदनीय आहे. त्यासंबंधी आगामी संशोधनात्मक लेखन व अभ्यासाला महत्त्व देण्यात यावे, अशी अपेक्षा आहे. देगलूर महाविद्यालयातील दोन्ही प्राध्यापकाच्या या पुस्तक प्रकाशनासाठी अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर आणि सचिव शशिकांत चिद्रावार व संचालक मंडळाने शुभेच्छा देऊन त्यांचे कौतुक केले. सूत्रसंचालन डॉ.भोगले तर आभार डॉ. राव यांनी मानले. प्रा. डॉ.राजपाल चिखलीकर, डॉ.रेड्डी , प्रा. डॉ. विठ्ठल जम्बालेसह इतर मान्यवर उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner